<table>
<tr><td rowspan="5">MHKO050022302021</td><td rowspan="2">संक्षिप्त फौजदारी खटला क्र. १०९८/२०२१ नि.७ लगत</td><td>दाखल तारीख</td><td colspan="3">०२/०६/२०२१</td></tr>
<tr><td>नोंदणी तारीख</td><td colspan="3">०२/०६/२०२१</td></tr>
<tr><td rowspan="3">महाराष्ट्र सरकार<br>वि.<br>युवराज विलास धोंडताळे</td><td>निकाल तारीख</td><td colspan="3">०२/०७/२०२६</td></tr>
<tr><td rowspan="2">कालावधी</td><td>वर्ष</td><td>महिने</td><td>दिवस</td></tr>
<tr><td>०५</td><td>०१</td><td>००</td></tr>
</table>

**न्यायदंडाधिकारी प्रथमवर्ग, न्यायालय क्रं.२, इचलकरंजी, जि.कोल्हापूर यांचे न्यायालयात**
**(पिठासीन अधिकारी डी. बी. साठे )**

:– **न्यायनिर्णय** –:–
**(अधिघोषीत दि.०२/०७/२०२६)**

सरकारपक्षाने आरोपीच्या विरुध्द महाराष्ट्र दारुबंदी अधिनियम खाली ८५(१), ९० च्या गुन्हयासाठी प्रकरण चालविले आहे.

२. प्रस्तुत प्रकरणाचे कामी आरोपीचे विरुध्द मुंबई मद्य निषेध अधिनियम, १९४९ चे कलम ८५(१) अन्वये प्रतिकथन नोंदविले. आरोपीने सदरचे प्रतिकथन त्यांना मान्य नसल्याचे कथन करुन संपरिक्षा घेण्याची विनंती केली.

३. सरकार पक्षातर्फे विधीज्ञ श्री.गोपलकर व आरोपी तर्फे विधीज्ञ श्रीमती शेख यांचा युक्तीवाद ऐकला. सदर प्रकरणाच्या अंतिम न्यायनिर्णयासाठी खालील मुद्दे प्रस्थापित केलेले आहेत. सदरचे मुद्दे, कारणमिमांसा व निष्कर्षासह खालीलप्रमाणे.

| अ.क्र. | मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| १. | दि.२८/०३/२०२१ रोजी २१.१० वाजताचे सुमारास ॲलायन्स हॉस्पीटल, इचलकरंजीचे पाठीमागील बाजुस असले लायकर मळयातील रोडवर उघडयावर सार्वजनिक ठिकाणी दारू पिवून आरडाओरडा करत असताना मिळून आला व त्यायोगे महाराष्ट्र मद्य निषेध अधिनियम, १९४९ चे कलम ८५(१), ९० प्रमाणे गुन्हा केला आहे असे अभियोगपक्षाने सिध्द केले आहे काय ? | ..नाही. |
| २. | अंतिम आदेश | **आरोपीला निर्दोष मुक्त करण्यात येत आहे.** |

# कारणमिमांसा

**मुद्दा क्र.१ व २ बाबतः–**

**४.** अभियोगपक्षाने आरोपीविरुध्दचा गुन्हा सिध्द करण्यासाठी सा.क्र.१ सर्जेराव कळंत्रे यांना तपासण्यात आले आहे. अभियोगपक्षास संधी देवून देखील इतर साक्षीदार हे साक्षीसाठी उपलब्ध होवू शकले नाहीत. म्हणून नि.क्र.१कडे आदेश पारीत करून अभियोगपक्षाचा पुरावा बंद केला. आरोपीविरूध्द सबळपुरावा अभिलेखावर न आल्यामुळे आरोपीचे फौजदारी प्रक्रिया संहिता कलम ३१३ (१)(ब) अन्वये निवेदन नोंदविणेत आले नाही.

**५.** सरकारपक्षाचे साक्षीदार क्र.१ सर्जेराव कळंत्रे यांनी त्यांच्या पुराव्यामध्ये असे कथन केले आहे की, त्यांना दि.२८/०३/२०२१ रोजी पोलिसांनी बोलाविले होते. पोलिसांच्या सांगण्यावरून त्यांनी एका को–हा कागदावर सही केली. त्यातील मजकूराबाबत त्यांना माहित नाही. सदर साक्षीदार अभियोगपक्षास मदत करत नसल्यामुळे त्याला उलटतपासामध्ये सुचक प्रश्न विचारण्यात आले परंतू त्यामधुनही कोणताही पुरावा अभिलेखावर आलेला नाही. त्यामुळे सदरील साक्षीदाराची साक्ष ही आरोपीविरुध्द गुन्हा सिध्द करण्याकरीता उपयुक्त नाही.

**६.** सदर कामी अभियोगपक्षाने प्रत्यक्षदर्शी साक्षीदारांची साक्ष नोंदवलेली नाही. घटनास्थळ पंचनाम्यावरील पंच तपासण्यात आलेला नाही. घटनास्थळी हजर असलेल्या किंवा दुसऱ्या एकाही स्वतंत्र साक्षीदाराची साक्ष नोंदविणेत आलेली नाही. त्यामुळे घटनास्थळ पंचनामा हा सिध्द झालेला नाही. घटनेदिवशी आरोपी दारू पित असल्याबाबतचा वैदयकिय तपासणी अहवाल दाखल नाही. तसेच त्याच्या अनुषंगाने डॉक्टरांना तपासले नाही. एखादा व्यक्ती दारू पिला आहे किंवा कसे हे तपासण्यासाठी त्या व्यक्तीची रक्त व लघवीची तपासणी करणे आवश्यक आहे. अभियोगपक्षाने आरोपीचे ब्रेथ ॲनेलेसेसचे प्रमाणपत्र दाखल केले आहे. सदर अहवालामध्ये आरोपीचे रक्त व लघवीची तपासणी केली नाही असे स्पष्टपणे लिहलेले आहे तसेच वैदयकिय प्रमाणपत्राच्या अनुषंगाने अभियोगपक्षाने वैदयकिय अधिकारी यांना तपासलेले नाही. त्यामुळे घटनेदिवशी आरोपींनी घटनेदिवशी दारू पिलेली होती ही बाब

निर्विवाद व विनाशंका सिध्द झालेली नाही. सबब मुद्दा क्र. १ ला मी नकारार्थी उत्तर देतो व मुद्दा क्रमांक २ च्या अनुषंगाने खालीलप्रमाणे आदेश पारित करण्यात येतो.

## आदेश

१. आरोपी युवराज विलास धोंडताळे यांना फौजदारी प्रक्रिया संहिताचे कलम २५५ (१) नुसार महाराष्ट्र मद्य निषेध अधिनियम,१९४९ चे कलम ८५(१),९० खालील गुन्हयामधून निर्दोष मुक्तता करण्यात येत आहे.

२. आरोपींचे वैयक्तीक जातमुचलके रद्द करण्यात येतात.

३. जप्त मुद्देमाल एक हिरो होंडा स्पलेंडर प्रो मोटारसायकल क्र. एम. एच. ०९– सी. झेड. ३३०६ ही गाडीचा कायमस्वरूपी ताबा अपिल कालावधीनंतर त्याच्या मूळ मालकास देण्यात यावा.

४. आरोपींनी फौजदारी प्रक्रिया संहिता कलम ४३७ अ ची पूर्तता म्हणुन वैयक्तिक जातमुचलका रुपये ५,०००/– चा द्यावा.

(न्यायनिर्णय खुल्या न्यायालयात उद्घोषित)

Digitally signed by DATTATRAY BHAGWAN SATHE
Date: 2026.07.02 15:37:53 +0530

**इचलकरंजी** **(डी. बी. साठे)**
**दिनांकः ०२/०७/२०२६** **न्यायदंडाधिकारी वर्ग–१, न्यायालय क्र.३**
**इचलकरंजी, जि.कोल्हापूर**